Vol 2 Issue 5 Nov 2012 ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**Welcome to GRT**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.in**

Golden Research Thoughts
Volume 2, Issue. 5, Nov. 2012
ISSN:-2231-5063
Available online at www.aygrt.net

RESEARCH PAPER

GRT

# *अहिल्याबाई होळकर एक कुशल व न्यायनिष्ठूर प्रशासक*

*अनिल माणिकराव बैसाणे,*

इतिहास विभाग प्रमुख, झुलाल भिलाजीराव पाटील महाविद्यालय, धुळे.

*सारांश :*

एका सामान्य धनगर कुटुंबात जन्म झालेली अहिल्याबाई होळकर घराण्याच्या सून बनल्यात. बाळबोध, गणित भूगोल अशा विषयांबरोबरच लष्करी आणि प्रशासकीय शिक्षण घेतले. अवघ्या २६ व्या वर्षी वैधव्य प्राप्त झाले तरी सती न जाता एका कार्यक्षम मुलास दत्तक घेवून स्वतः राज्यकारभार पाहिला. अनिष्ठ रूढी-परंपरांना आणि ब्राह्मण्यवादास विरोध करून वाटचाल केली. न्यायनिष्ठुरता, पराक्रम-धूर्त आणि मुत्सद्दीपणा, धार्मिक व सामाजिक सहिष्णुवृत्ती, कुशल आणि आदर्श राज्यकर्ती, शांतताप्रिय व्यक्तिमत्व, पराक्रम अशा गुण असलेल्या अहिल्याबाईंनी एक यशस्वी राज्यकर्ती महिला म्हणून देशासमोर आणि समाजासमोर आदर्श घालून दिला. एकीकडे पेशवाईत सत्ता व दौलतीचा हव्यास, खून, कर्मकांड, जनतेचे अकल्याण अशा बाबींना ऊत आला असता सुभेदारांच्या विधवा सुनेने चालविलेला राज्यकारभार ही बाबच मोठी वैशिष्ट्यपूर्ण होती. म्हणूनच त्यांच्या 'मातुश्री' म्हणून होणारा गौरव व इंग्लंडच्या राणीशी होणारी तुलना हा मोठा सम्मानच ठरतो.

## *बालपण*

नगर जिल्ह्यातील चौंडी गावात एका सामान्य धनगर कुटुंबात अहिल्याबाई होळकर यांचा ३१ मे १७२५ रोजी जन्म झाला. वडील माणकोजी शिंदे ह्यांच्याकडे चौंडी गावाच्या पाटीलकीचे वतन होते तर आईचे नाव सुशिलाबाई असे होते. वयाच्या अवघ्या ८ व्या वर्षी २० मे १७३३ रोजी मल्हारराव होळकरांच्या खंडेराव या मुलाशी विवाहबद्ध झाल्या. त्यांना मुलगा मालेराव व मुलगी मुक्ताबाई अशी दोन अपत्य होती. मुक्ताबाईचा विवाह यशवंतराव फणसे या ध्येयवादी पराक्रमी तरूणाशी लावून दिला. मुक्ताबाई आणि यशवंतराव यांना एक मुलगा नाथोबा होता. खंडेराव होळकर म्हणजे पती आणि मुलगा मालेराव यांचे निधन झाल्यामुळे तत्पूर्वीच सासरे मल्हारराव होळकर यांचे निधन झाले होते. तुकोजी होळकर या नात्यातील मुलालाच दत्तक घेवून होळकर साम्राज्याचा मोठ्या कुशलतेने व न्यायनिष्ठुरतेने राज्यकारभार चालविला.

## *शिक्षण :*

अहिल्याबाईंना मराठी व मोडी लिहिता वाचता येत होती. त्याचबरोबर त्यांना संस्कृत, हिंदी, गणित आणि भूगोल या विषयांचेही ज्ञान होते. याचबरोबर घौडदौड करणे, तलवार आणि दांडपट्टा चालविणे, मोहिमा हाती घेणे, राज्याचा पत्रव्यवहार, करवसुली, न्यायनिवाडा करणे म्हणजेच लष्करी आणि प्रशासन चालविण्याचे शिक्षण त्यांनी घेतले होते. याचा फायदा त्यांना पुढील काळात झाल्यानेच अहिल्याबाईंनी कुशलतेने राज्यकारभार पाहिला.[१]

*न्यायनिष्ठुरता :*

अहिल्याबाईंच्या व्यक्तिमत्त्वातील न्यायनिष्ठुरता हा महत्त्वाचा गुण होता. म्हणूनच त्यांनी स्वतःच्या पतीलाही माफ केले नव्हते. पती खंडेराव होळकर यांनी एका मोहिमेत मिळविलेली लुट ही स्वतः करिता वाड्यावर नेली असता अहिल्याबाईंनी त्यांना सरकारी तिजोरीत लूट जमा का केली नाही असा जाब विचारला, तेव्हा खंडेराव म्हटले की ही लूट मी स्वतः माझ्या मनगटाच्या जोरावर मिळविली आहे. यावर अहिल्याबाईंनी सांगितले की, 'सुभेदारी भोगणाऱ्यांची मनगटे ही सर्वसामान्य रयतेच्या हितसंवर्धनासाठी असतात.' आपण सुभेदारांचे वारस आहात कोणी चोरपेंढारी नाहीत. नियत शाबूत ठेवणे हा राज्यकर्त्यांचा प्राण असतो. म्हणून आपण मिळवलेली लूट ही फडणीशीत जमा करा. पुण्याच्या आणि होळकर राज्याच्या तिजोरीत हिस्सा भरल्यावर आपला हिस्सा घ्यावा. यात खंडेरावांनी विरोध केला तरी न जुमानता अहिल्याबाईंनी लुट सरकारात जमा केली. एवढेच नव्हे तर दरबारी रितीरिवाज न पाळणाऱ्या खंडेरावांना दंड करण्याचे सांगून त्याची अंमलबजावणीही केली होती.[२] राज्याचे सर्व मुलकी प्रशासन हे अहिल्याबाईंनी सांभाळले होते. म्हणूनच मल्हाररावांना लष्करी प्रशासन सांभाळून रणंगणावर मोठा पराक्रम गाजविता आला. अशा कार्यकुशल सूनेवर प्रसन्न होवून मल्हाररावा अहिल्याबाईस सून नव्हे तर आपला मुलगाच मानीत होते.

*अनिष्ट रूढी–परंपरांना व ब्राह्मण्यवादास विरोध :*

रघुनाथराव उत्तरेच्या मोहिमेवर असतांना मित्र असलेल्या सूरजमल जाट यांच्याशी वितुष्ट निर्माण केले. सुरजमलकडून २ कोटींच्या खंडणीची मागणी केली. सुरजमलने नकार दिल्याने त्यांच्यात संघर्ष सुरू झाला. सुरजमलने कुंभेरी गडाचा आश्रय घेतला. म्हणून मराठ्यांनी कुभेरीस वेढा देवून गडावर तोफांचा भडिमार केला. झालेल्या प्रती हल्ल्यात कुभेरीतून येणाऱ्या तोफगोळ्यात मल्हाररावांचा एकुलता एक मुलगा खंडेराव मारला गेला. मल्हाररावांनी भीष्म प्रतिज्ञा केली की, 'सूरजमल जाटाचा शिरच्छेद करून कुंभेरीची माती यमुनेत टाकीन तरच जन्मास आल्याचे सार्थक ?' तर सुरजमलला अभय देवून जयप्पा शिंदेनी तह घडवून आणल्याने शिंदे होळकर असा नवा वाद उभा राहिला. याप्रसंगी अहिल्याबाई होळकरांनी आपल्या सासऱ्यांचे ऐकून सती न जाता गोर-गरिबांचे प्रपंच सुखी करण्याकरिता सर्व आयुष्य राज्य व प्रजेच्या हिताकरिता समर्पित केले. परंपरेने चालत आलेल्या सती सारख्या अनिष्ट रूढी-परंपरांना विरोध करून स्त्री मुक्तीचाच निर्देश दिला.

असे असले तरी खंडेरावांबरोबर काही मुस्लिम स्त्रिया मात्र सती गेल्या होत्या. ज्यावेळी खंडेरावांचे श्राद्ध घालण्यात आले तेव्हा मुस्लिम स्त्रियांची नावे घेवून पळीने पाणी सोडण्यास विरोध केला. ब्राह्मणांनी दाखविलेला हा धार्मिक आणि जातीयवाद मात्र अहिल्याबाईस मान्य नव्हता. त्यांनी ब्राह्मणांना समज देत सांगितले की, श्रद्धेने करायचे ते श्राद्ध त्या स्त्रिया जातपात विसरून आपल्या स्वामींबरोबर सती गेल्यात आणि त्यांचे नाव घेवून दोन पळ्या पाणी सोडायला आपण विरोध करणे योग्य नाही. त्यांची नावे घेवून श्राद्ध घातल्याशिवाय मी अन्नग्रहण करणार नसल्याचे सांगून त्या ठाम राहील्यात. धर्म माणसासाठी की धर्मासाठी माणूस अशीही विचारणा करून त्यांनी आपल्यातील मानवतावादाचे दर्शन घडविले.[३]

*पराक्रम धुर्त व मुत्सद्दीपणा :*

पती, सासरे आणि मुलगा मालेरावांचेही निधन झाल्याने होळकर गादीचा वारसाचा प्रश्न निर्माण झाला. दिवाण गंगाधरपंत चंद्रचूड आणि रघुनाथराव दादांनी दत्तक घेवून त्यांच्याकडे राज्यकारभार सोपवून आपण पाप क्षालनार्थ काशीला निघून जाण्याचा सल्ला दिला. रघुनाथराव व दिवाण यांच्या स्वार्थी मतलबीपणाची जाणीव अहिल्याबाईंना असल्यामुळे त्यांनी होळकर घराण्यातील नातलग मुलगा तुकोजी होळकर यास दत्तक घेवून स्वतः राज्यकारभार सांगितला. एवढ्यावरच रघुनाथराव थांबला नाही तर होळकरांचे राज्य बुडविण्याचे प्रयत्न चालविलेत तेव्हा त्यास इशारा दिला की, झालेल्या संघर्षात आमचा पराभव झाला तर आमची काहीही नाचक्की होणार नाही कारण शेवटी आम्ही बाईमाणूसच मात्र आपला पराभव झाला तर आपण पेशवेबंधू प्रति पेशवाच ! म्हणून आपल्या इभ्रतीचा विचार करावा. तेव्हा रघुनाथरावास जाणीव झाल्याने आक्रमण थांबविले.

तसेच बारभाई कारस्थानास पाठिंबा देवून रघुनाथरावांच्या कारवायांना विरोध केला होता. एवढेच नव्हे तर त्यास आश्रय देणाऱ्यास कडक शासन करण्याचा इशाराही दिला होता. घरभेद्यास ठेचून काढले जाईल, म्हणून सांगून 'आपण धनीपण गामावले आहे, नर्मदा ओलांडल्यास खणाखणी होईल' असेही रघुनाथरावास कळविले होते. याचबरोबर महादजी शिंदेशी होत असलेल्या सलोखाप्रसंगी दोन हात करण्याचीही तयारी अहिल्याबाईंनी दाखविली होती. यावेळी दबाव आणण्याकरिता महादजी शिंदे म्हणालेत की, 'अधिक उणे न बोलता जोडून घ्यावे, आम्ही पुरूष आपण स्त्री पाहाता आम्ही आक्रमणाचे ठरविल तर ?' यावर अहिल्याबाईंचे उत्तर म्हणजे

त्यांच्यातील पराक्रमी मुत्सद्दीपणाचा कळसच होय. 'अवश्य पाटीलबाबा कैलास बासींच्या कृपेने इथेही कोणी बांगड्या भरून बसलेले नाहीत. एकेकाला साखडदंडाने नाही बांधले तर सुभेदारांचे नाव सांगणार नाही.'

महत्त्वाचे म्हणजे अहिल्याबाईंनी धूर्त व कावेबाज इंग्रजांच्या राजनीतीला ओळखले पाहिजे असे माधवराव पेशव्यांना कळवतांनाच राज्याच्या रक्षणासाठी आधुनिक व मोठी फौज ठेवण्याचाही निर्देश दिला होता.

### *सर्वधर्म समभाव*

अहिल्याबाई सर्व जाती व सर्व धर्मियांना समभावनेने वागवित असत. हिंदू रयतेकरिता जशी हितसंवर्धक कामे केली तशीच मुस्लिम प्रजेकरिताही केलीत. मुस्लिम संतानाही जमिनी देऊन मशिदी/दर्गे बांधून दिलेत. श्रावण मासमध्ये हिंदू प्रमाणेच मुस्लिम फकिरांनाही खैराती देत असत. एवढेच नव्हे तर हिंदू-मुस्लिम ऐक्य होण्यावर आणि सहजीवनावर त्या भर देत. 'आम्ही आपल्या दर्ग्यास वर्षासने देतो म्हणून मंदिराचा नाश करणाऱ्या आपल्या भावांना सांगा धर्म वैर करायला शिकवत नाही. ईश्वर अल्ला एकच आहेत अशी जाणीव त्या करून देत.

शास्त्री-पंडित, मुल्ला-मौलवी, मुर्तीकार, कवी-लेखक, वैद्य, पंडित अशा सर्व जातीधर्मातील बुद्धिवंताना त्यांनी आश्रय दिला होता.[४] जातिवाद नष्ट करण्यासाठी आंतरजातीय विवाहांना उत्तेजन दिले होते. त्यांच्या या कार्याचे स्मरण रहावे म्हणूनच की काय म. जोतिबा फुलेंनी पुण्यात काढलेल्या पहिल्या अस्पृश्यांच्या शाळेस 'अहिल्याश्रम' असे नाव दिले होते. राज्यकारभारात गुणात्मक बाबींना महत्त्व दिले. मुलगी मुक्ताबाईचा विवाह करतांना त्यांनी असे जाहीर केले होते की, दरोडेखोरांचा बंदोबस्त करणाऱ्यांशी मुलींचा विवाह केला जाईल.

यशवंतराव फणसे यांनी ही आज्ञा स्वीकारली तेव्हा त्यास सर्व लष्करी व आर्थिक सहाय्य केले होते. यशवंतरावांच्या पराक्रमावर प्रसन्न होवून मुक्ताबाईंशी विवाह लावून दिला. इंदोरहून राजधानी 'महेश्वर' येथे नेवून मोठी भरभराट घडवून आणली. कायदेपद्धतीत बदल करून करपद्धती सौम्य करण्यात आली.[५]

### *राज्यकारभारात महिलांचा सन्मान केला :*

अहिल्याबाई ह्या महिलांचा सन्मान करणाऱ्या प्रशासक होत्या. पडदा पद्धतीस विरोध करून स्त्रियांची प्रशिक्षीत अशी लष्करी फौज उभी केली होती. स्त्रियांना दत्तक घेण्याचा हक्क मान्य करण्यात आला होता. मुलगा माालेरावांचे लग्न मल्हाररावांनी बहाड घराण्यातील मैना या मुलीशी ठरविले. तेव्हा अहिल्याबाई नाराज होत्या. कारण आपला मुलगा हा लायक नसल्याने मुलीची फसगत होईल असे त्यांना वाटत. म्हणून त्यांनी आपल्या व्याहींशी चर्चा केली, अहिल्याबाईंचा मोठेपणा पाहून त्यांनी आपली मुलगी सून म्हणून अहिल्याबाईंच्या सेवेत वाहिली.[६]

खरगोनच्या एका विधवा महिलेने सर्व दौलत अहिल्याबाईंच्या स्वाधीन करण्याचे ठरविले तेव्हा अन्नछत्रे, पाणपोया, निराधार मुला-मुलींचे शिक्षण यावर खर्च करून दानाचे सुख घ्या असे सुचविले. एवढेच नव्हे तर त्या महिलेला संरक्षणही पुरविले.

### *चोर–दरोडेखोरांचा बंदोबस्त :*

राज्यात भिल्ल, गोंड, रामोशी जमातीचे लोक वाटसरूंना लुटीत असत. अहिल्याबाईंनी त्यांच्यात परिवर्तन घडवून आणले. त्यांच्याकडूनच वाटसरूंचे संरक्षण करून घेतले. लुटमारीची जबाबदारी त्यांच्यावर टाकण्यात आली. महत्त्वाचे म्हणजे त्यांना वाटसरूंकडून संरक्षणाच्या मोबदल्यात 'भिलकवडी' हा कर घेण्याचा हक्क दिला. त्यामुळे ह्या जमातीही अहिल्याबाईंच्या भक्त बनल्यात.

### *होळकर साम्राज्याचे कुलचिन्ह :*

गोलाकार वर्तुळाकार बाह्यांगाला अखंड साखळी असून मध्यभागात वर छत्र आणि सूर्य दाखविला आहे. त्याच्याच खाली तलवार व भाला हे एकमेकांना क्रॉस दाखवून त्यांच्या एका बाजूला बैल व दुसऱ्या बाजूला घोडा दाखविण्यात आला आहे. त्यांच्यासमोर अफु व गव्हाचे पीक दाखविले असून खाली असलेल्या वलयांकित पट्ट्यात "प्राहोमेशोलभ्या श्री : कर्तु : प्रारब्धत्" असे ब्रीद वाक्य दिलेले आहे. म्हणजेच आमच्या छत्राखाली सुरक्षित असलेल्या प्रजेला प्रकाशमान होता यावे. तलवार व भाला हे लष्करी सामर्थ्य दर्शवितात तर घोडा आणि बैल पिके यांच्या प्रतिमा संपन्न कृषी आणि लष्करी व्यवस्था दाखविते. महत्त्वाचे म्हणजे "जो प्रयत्न करतो त्यालाच यश प्राप्त होते" असा कार्यक्षमता सूचक निर्देश आपल्या ब्रीदमधून व्यक्त केला आहे.[७]

थोडक्यात राज्यात पाठशाळा आाणि मदरशांमधून धर्म आणि नीती शिक्षण देवून राज्यात सामजिक आणि धार्मिक ऐक्य प्रस्थापित केले होते. धर्मशाळा, पायविहीर व अन्नछत्रांमधून मोठ्या सामाजिक कार्याचा आदर्श देशासमोर ठेवला होता. अशा कुशल प्रशासकाचा जनतेने उत्स्फूतपणे मातुश्री ह्या पदवीने सम्मान केला आहे. तर कर्तृत्व व परमेश्वरावर श्रद्धा या दोन गुणांचे उत्कृष्ट उदाहरण म्हणजे अहिल्याबाई असे जॉन माल्कम यांनी स्तुती केली आहे.

***संदर्भ :***

१) निकम प्रा. गौतम, राष्ट्रमाता (जिजामाता भोसले, अहिल्यामाई होळकर), विमलकिर्ती प्रकाशन, चाळीसगाव, २०१३, पृ.२४-२५.
२) घोणसे श्यामा, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, भारतीय विचारसाधना, पुणे प्रकाशन, पुणे, २००५, पृ. १३
३) तत्रैव, पृ. १४-१५
४) कुलकर्णी सुजाता (संपा.), पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, वेदांत पब्लीशर्स, मुंबई, पृ. २८
५) निकम प्रा. गौतम, उपरोक्त, पृ. २८
६) घोणसे श्यामा, उपरोक्त, पृ. १५
७) भुजाडे होमेश, राष्ट्रमाता महाराणी अहिल्यामाई होळकर, मौर्यक्रांती प्रकाशन, वर्धा, पृ. १०६

***अनिल माणिकराव बैसाणे,***
इतिहास विभाग प्रमुख, झुलाल भिलाजीराव पाटील महाविद्यालय, धुळे.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.in